# नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा

## दि.14/3/2022 प्रशासकीय सभेचे कार्यवृत्त

**1.सन 2022-23 करिता दैनिक बाजार,आठवडी बाजार बैठक वसुली व जाहिरात कर वसुली कंत्राट पध्दतीने देण्यास प्रशासकीय मान्यता देणे**

मलकापूर नगर परिषदेचे सन 2022-2023 या आर्थीक वर्षा मध्ये दैनिक बाजार व आठवडी बाजार तसेच जाहिरात कर वसुलीचा कंत्राट करिता नियमानुसार सन 2021-22 चे निश्चित केलेल्या दरामध्ये 10 टक्के वाढ करुन सन 2022-23 ची किंमत निश्चित खालील प्रमाणे

| अ.क्रं. | कंत्राटाचे नांव | सन 2021-22 कंत्राट किंमत | सन 2022-223 (10टक्के वाढ करुन) |
|---|---|---|---|
| 1 | दैनिक बाजार बैठक वसुली | 12,15,203 | 13,36,723 |
| 2 | आठवडी बाजार बैठक वसुली | 9,16,526 | 10,08,178 |
| 3 | जाहिरात कर वसुली | 1,47,054 | 1,61,759 |

वरील प्रमाणे किंमत निश्चित करुन सन 2022-23 करिता दैनिक बाजार व आठवडी बाजार बैठक वसुलीसाठी ई निविदा करावी लागेल व जाहिरात कर वसुलीसाठी जाहिर लिलाव करावा लागेल तसेच ठरविलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त बोर्ड लावण्यात मनाई असावी.मुदतीपर्यंत बोर्ड लावणे व मुदती काढणे याची जबाबदारी कंत्राटदार यांचे कडे राहील तसेच नगर परिषदेच्या सर्व साधारण सभा ठराव क्रं.23 दिनांक 29/7/2020 व स्थायी समिती सभा ठराव क्रं.9 दि.9/02/2021 च्या ठरावा मध्ये जाहिरात दर निश्चित केल्यानुसार कार्यवाही केली जाईल तसेच कोराना विषाणुच्या प्रार्दुभावामुळे मागील दोन वर्षापासून (सन 2019-20 व 2020-21) दैनिक बाजार व आठवडी बाजार कंत्राट निविदा सूचना प्रसिध्द करुन सुध्दा एकही व्यक्तीने कंत्राट घेतलेले नाही त्यातच आठवडी बाजार बैठक वसुलीवर मा.जिल्हाधिकारी यांनी कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावाचा फैलाव होवू नये म्हणून बंदी घातलेली आहे.व ती आज पर्यंत कायम आहे.त्यामुळे बंदी उठताच आठवडी बाजार कंत्राट दयावा लागेल.वरील प्रमाणे सरकारी किंमत निश्चित करण्यात यावी. अशी टिप्पणी सहा मिळकत व्यवस्थापक व मुख्याधिकारी यांनी सादर केलेली आहे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून दैनिक बाजार बैठक वसुली,आठवडी बाजार बैठक वसुली,जाहिरात कर वसुली करिता सन 2022-23 करिता वर नमूद केलेली सरकारी किंमत निश्चित करण्यास तसेच यासाठी आवश्यक ती निविदा प्रक्रिया,जाहिर हर्रास करण्यास तसेच यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्रं.2सन 2022-23 करितानगर परिषद क्षेत्रात विविध प्रभागामध्ये विविध ठिकाणी कठीण,मुरुम मऊ मुरुम 80 मी.मी आकाराची खडी ,40 एम एम आकाराची खडी 6 एम.एम आकाराची क्रशर खडीचा पुरवठा करणे व पसरविणे इ.कामाकरिता वार्षीक दर मागविण्यास प्रशासकीय मान्यता देणे.**

नगर परिषद क्षेत्रामध्ये वेळोवेळी विविध ठिकाणी नळ कनेक्शन करिता रस्ता खोदकाम करण्यात येते किंवा इतर कारणांमुळे किंवा पावसामुळे रस्त्यावर खडडे पडतात रहदारी सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने अथवा अनेक धार्मीक उत्सावाच्याअनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खडडे वरील साहित्य वापरुन बुजवावे लागतात सदर कामे वेळोवेळी दर मंजूर नसल्याने वेळेत करणे शक्य होत नाही.त्याकरिता पुरवठाधारकांकडून वार्षीक दरपत्रक मागविणे योग्य राहिल जेणे करुन वेळोवेळी उदभवणारे खडडे बुजविण्याचे काम वेळेत करणे शक्य होईल सदरचे काम न.प.निधी

Scanned with CamScanner

अंतर्गत करावे लागेल तसेच यास अंदाज रु.25 लक्ष खर्च येईल असे नगर अभियंता मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.या वर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेवून सन 2022-23 करितानगर परिषद क्षेत्रात विविध प्रभागामध्ये विविध ठिकाणी कठीण,मुरुम मऊ मुरुम 80 मी.मी आकाराची खडी ,40 एम एम आकाराची खडी 6 एम.एम आकाराची क्रशर खडीचा पुरवठा करणे व पसरविणे इ.कामाकरिता वार्षीक दर मागविण्यास तसेच त्यासाठी आवश्यक ती निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्यास व येणाऱ्या खर्चास व सदर चा खर्च न.प.निधी अंतर्गत करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्रं.3 सन 2022-23 करिता न.प.क्षेत्रातील विविध ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या वार्षीक दरपत्रक मागविण्यास मान्यता देणे**

नगर परिषद क्षेत्रामध्ये वेळोवेळी विविध ठिकाणी नळ कनेक्शन करिता रस्ता खोदकाम करण्यात येते किंवा सततच्या पावसामुळे किंवा इतर कारणांमुळे रस्त्यावर खड्डे पडतात त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच धार्मीक उत्सवाचे अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे काल मर्यादेत बुजविणे आवश्यक आहे. शहरातील कॉक्रीट रस्त्यावरील /डांबरी रस्त्यावरील व इतर रस्त्यावरील खड्डे बुजविणे आवश्यक असल्याने सन 2022-23 करिता साहित्याचे दर निश्चित झालेले असल्यास सदर काम कालमर्यादेत पूर्ण करता येते.सदरचे काम न.प.निधी अंतर्गत करावे लागेल तसेच या करिता अंदाजे 8 लक्ष खर्च अपेक्षित आहे.अशी टिप्पणी नगर अभियंता,मुख्याधिकारी यांनी सादर केली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, सन 2022-23 करिता न.प.क्षेत्रातील विविध ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या वार्षीक दरपत्रक मागविण्यास त्यासाठी आवश्यक ती निविदा प्रक्रिया करण्यास व सदरचे काम न.प.निधी अंतर्गत करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**(आर.यु.सुरडकर)**
**प्रशासक,**
**नगर परिषद,मलकापूर**

Scanned with CamScanner